**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक २३ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

1. **गगनयान मोहिमेसाठी आवश्यक असलेलं तंत्रज्ञान भारत वेगाने विकसित करत असून लवकरच गगनयान अंतराळात झेपावेल, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.**
2. **राज्यातल्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राज्यभरातल्या महानगरपालिका, जिल्हा परिषदांची प्रारूप प्रभाग रचना जाहीर.**
3. **नागपुरातील परंपरागत बडग्या मारबत उत्साहात, हजारोंच्या संख्यने नागरिक झाले सहभागी.**

   **आणि**
4. **कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे कुलगुरु प्रोफेसर हरेराम त्रिपाठी आणि त्यांच्या पत्नी यांचे रस्ते अपघातात निधन.**

**-------------------------------------**

पंतप्रधान नरेंद्र मोदी- अंतराळ दिन

गगनयान मोहिमेसाठी आवश्यक असलेलं तंत्रज्ञान भारत वेगान विकसित करत असून लवकरच गगनयान अंतराळात झेपावेल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे ते आज दुसऱ्या 'राष्ट्रीय अंतराळ दिना निमित्तानं' देशाला संबोधित करत होते. गेल्या काही काळांत अंतराळ क्षेत्रात भारतानं केलेल्या कामगिरीचा गौरवपूर्ण उल्लेख आणि भविष्यातल्या मोहिमांचा सूतोवाच करताना ते म्हणाले........

***(होल्ड बाइट- पंतप्रधान नरेंद्र मोदी)***

***2 साल पहले ही भारत पहला ऐसा देश बना था जिसने चंद्रमा के साउथ पोल पर पहुंचने का इतिहास रचा। हम स्पेस में डॉकिंग अनडॉकिंग की क्षमता रखने वाले दुनिया के चौथे देश भी बन गए हैं। जल्द ही आप सब वैज्ञानिक की मेहनत से भारत गगनयान की उड़ान भी भरेगा और आने वाले समय में भारत अपना स्पेस स्टेशन भी बनाएगा।***

‘आर्यभट्ट ते गगनयान’ ही, या वर्षीची या दिवसाची मध्यवर्ती संकल्पना असून यात भूतकाळाचा आत्मविश्वास आणि भविष्याचा संकल्प आहे,असं ते म्हणाले. अंतराळ तंत्रज्ञान क्षेत्रातल्या देशाच्या प्रगतीमुळ सामान्य नागरिकांच्या जीवनात अमूलाग्र बदल घडत असून कृषी,मासेमारी, आपत्ती व्यवस्थापन, कनेक्टिव्हिटी इत्यादी क्षेत्रांमध्ये हे क्षेत्र मोठं योगदान देत आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं.गेल्या ११ वर्षांत अंतराळ क्षेत्रात केलेल्या विविध सुधारणांची माहिती त्यांनी दिली. या क्षेत्राची दारं खासगी क्षेत्रासाठी उघडल्यामुळे सध्या ३५० स्टार्टअप्स या क्षेत्रात काम करत आहेत, असं मोदी म्हणाले. पुढच्या ५ वर्षांत अंतराळ क्षेत्रातले ५ युनिकॉर्न उभारायचं आणि प्रत्येक वर्षी ५० रॉकेट्सचं प्रक्षेपण करायचं ध्येय ठेवावं, असं त्यांनीसुचवलं. त्यासाठी या क्षेत्रात अत्याधुनिक सुधारणांची गरज असून त्या पूर्ण करायचा सरकारचा उद्देश आणि इच्छाशक्ती आहे, अशी ग्वाही प्रधानमंत्र्यांनी दिली.

-----------------------------------------

ऑनलाईन गेमिंग

ऑनलाईन गेमिंग प्रोत्साहन आणि नियमन विधेयक २०२५ नुकतंच संमत केलं झाल्यान आता याच कायद्यात रूपांतर होईल. गेमिंग मुळे सातत्यान एकच ठिकाणी बसून राहणे, शारीरिक हालचालीत कमी आणि संबंधित आजारांची शक्यता यावर आहारतज्ज्ञ मेघना कुमरे यांनी आकाशवाणी सोबात संवाद साधला-....

***(होल्ड बाईट - आहारतज्ज्ञ)***

***याच्यामुळे काय होते की ते एका जागेवर बसतात त्यांची सेंट्रल ओबीसीटी वाढतं. त्याचं बीएमआय वाढतो, त्याचे फॅट पर्सेंटेज वाढते आणि त्याच्यामुळे खूप साऱ्या डिसीजला ते स्वतःच आमंत्रण देतात आहे. फॉर एक्झाम्पल जर खूप वेळ बसत राहिले तर त्यांचा फॅटी लिव्हर जे नॉन अल्कोहलिक आहे. म्हणजे सेंट्रल ओबिसिटीमध्ये वाढते ते वाढणार त्यांचं कॅन्सर पेशंटचे चान्सेस जास्त वाढणार, त्याच्यानंतर त्यांची फिटनेस लेव्हल कमी होणार त्यांना पुढे जाऊन फिटनेस लेव्हल प्रत्येक ठिकाणी लागतो की तुमची कॅपॅसिटी काम करण्याची ती कमी होणार आणि त्याच्यामुळे हायपरलिपीडिया, हार्ट पेशंट, डायबिटीस हे सगळ्यांसाठी कारणीभूत असलेलं ओबीसीटी डेफिनेटली वाढणार.***

हे विधेयक स्वागतार्ह असल्याची प्रतिक्रिया कुमरे यांनी दूरध्वनी वरून दिली आहे.

-------------------------------------

प्रभाग रचना

राज्यातल्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी महानगरपालिकांची प्रारूप प्रभाग रचना काल जाहीर झाली. २९ महानगरपालिकांसाठी प्रभाग निश्चित करण्यात आले आहेत. दरम्यान प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिद्धीची अधिसूचना आज नागपूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. आजपासून ते चार सप्टेंबर दुपारी तीन वाजेपर्यंत या विषयी हरकती आणि सूचना सादर करण्याचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. या हरकती आणि सूचना महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे निवडणूक कार्यालय किंवा संबंधित प्रभाग कार्यालयाच्या मुख्यालय इथे सादर करता येतील. हरकती आणि सूचना दाखल करणाऱ्या नागरिकांना सुनावणी करता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळवण्यात येणार आहे. असं मनपा तर्फे पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

-------------------------------------

व्याख्यानमाला

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त ‘१०० वर्षांची संघ यात्रा- नवे क्षितिज’ या शीर्षकाखाली एक विशेष व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. ही व्याख्यानमाला २६, २७ आणि २८ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ५:३० वाजता, दिल्लीच्या विज्ञान भवन येथे संपन्न होणार आहे. या व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत हे मार्गदर्शन करणार आहेत. संघाच्या १०० वर्षांच्या वाटचालीचा आढावा, वर्तमान भूमिका आणि भविष्यातील दिशादर्शन या सर्व पैलूंवर या व्याख्यानमालेत प्रकाश टाकण्यात येणार आहे.

-------------------------------------

सर्जियो गोर

अमेरिका-भारत यांच्यातील संबंध व्यापार धोरणावरुन तणावपूर्ण असताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाईट हाऊस च्या प्रेसिडेंशियल पर्सनल ऑफिसचे सध्याचे संचालक सर्जियो गोर यांना भारताचे राजदूत म्हणून घोषित केलं आहे. सर्जियो गोर यांना दक्षिण आणि मध्य आशियाई व्यवहारांसाठी विशेष दूत म्हणूनही नियुक्त करण्यात आलं आहे. भारतावर लादण्यात आलेल्या मोठ्या शुल्कादरम्यान ट्रम्प यांनी हा निर्णय घेतला आहे.

'मेक अमेरिका ग्रेट अगेन' हे मिशन, गौर पुढे नेतील असा विश्वास ट्रम्प यांनी व्यक्त केला.

-------------------------------------

पोळा-मारबत

नागपूर इथं तान्हा पोळा निमित्त १४४ वर्षांची परंपरा असलेली काळी आणि पिवळी मारबत बडगा मिरवणूक काढण्यात आली आहे. 'इडा- पीडा- रोग- राई घेऊन जा गे मारबत' म्हणत हजारोंच्या संख्यन लोकांनी मारबत मिरवणुकीत सहभाग घेतला. पूर-आपत्ती, महागाई, अमेरिकेचे वाढीव टॅरिफ इत्यादी ज्वलंत मुद्द्यांवर भाष्य करणारे फलक यावेळी दाखविण्यात आले. सर्व प्रथम मोठी पिवळी मारबत जागनाथ बुधवारी येथून निघून गोळीबार चौक मार्गे मस्कासाथ या चौकातून नेहरू पुतळा इथं पोचली. या ठिकाणीच नेहरू पुतळ्या लगत असणारी काळी मारबत नेहरू पुतळा चौकात पोचली. तसच लहान पिवळी मारबत ही सुध्दा गोळीबार चौकातून मस्कासाथ मार्गे नेहरू पुतळा चौक इथं आली. परंपरे प्रमान दरवर्षी मोठी पिवळी मारबत आणि काळी मारबत यांची नेहरू पुतळा चौक येथे भेट झाल्यानंतर तिन्ही मारबत शहीद चौकात मार्गक्रमण करतात. मारबत मुळे अनेक रस्त्यांची वाहतूक वळती करण्यात आली असून, पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला आहे. तत्पूर्वी, बैलपोळ्याचा सण काल सर्वत्र उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीन साजरा झाला. बैलांना सजवून त्यांची मिरवणूक काढून पूजा करण्यात आली. घरोघरी त्यांना पुरणपोळीचा घास भरवण्यात आला.

-------------------------------------

प्रो.हरेराम त्रिपाठी

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्व विद्यालयाचे कुलगुरु प्राध्यापक हरेराम त्रिपाठी आणि त्यांच्या पत्नीचा आज पहाटे रस्ते अपघातात मृत्यू झाला. उत्तर प्रदेशमधल्या कुशीनगर जवळ हा अपघात झाला. प्राध्यापक हरेराम त्रिपाठी हे भारतीय दर्शनशास्त्र, न्यायशास्त्राचे प्रख्यात विद्वान आणि तत्त्वज्ञ होते. राज्यपाल आणि कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी त्यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. संस्कृत भाषेसाठी निष्ठेनं झटणारा एक संशोधक, अभ्यासक आणि उत्तम प्रशासक गमावला आहे, असं त्यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्राध्यापक हरेराम त्रिपाठी यांना श्रद्धांजली वाहिली. तसंच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, नागपूरचे

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

-------------------------------------

हवामान

विदर्भात पुढील आठवड्यापासून अर्थात 25 ऑगस्ट पासून वादळी पर्जन्यमान राहण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागान वर्तवली आहे. या दरम्यान बहुतांश जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी वारे आणि हलक्या स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. दरम्यान 27 ऑगस्ट रोजी पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागान वर्तवली आहे, आज आणि उद्या हवामान सामान्य राहणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

-------------------------------------